## शंकर नागरी सहकारी बँक लि; नांदेड
(सी.बि.एस.बँक)

### सुचना

- बचत करा आणि गुंतवणूक करा.
- निवृत्ती खाते उघडा.
- जेंव्हा बचतीला प्राधान्य दिले जाईल तेंव्हा
- तुम्ही खरोखर धन जमविण्यांस सुरुवात कराल.

---

**बँकेत जातांना किंवा परत येताना :-**

- कॅश हातात घेवून जावू नका.
- मोठी कॅश जवळ असल्यास जोडीदार बरोबर घ्या आणि
- जवळपास संशयित व्यक्ती बाबत जागरुक रहा. बरेचसे गुन्हे
- शनिवारी संध्याकाळी किंवा सोमवारी सकाळी जेव्हा मोठया कॅश हाताळल्या जातात तेंव्हा चो-या होतात.
- आपला कोणी पाठलाग करत नाही ना, याची खात्री करा.

---

**व्यवहारात सुरक्षिततेसाठी या गोष्टी पाळा :-**

- शक्यतो बँकेत व्यवहार स्वत:च करा.
- चेकबुक नेहमी सुरक्षित जागी ठेवा. कधीही चेक्सवर सहया करुन ठेऊ नका.
- दिलेल्या किंवा जमा केलेल्या चेक्सच्या नोंदी पासबुकात व्यवस्थित झाल्याची खातरजमा करा. कांही संशयात्मक नोंद आढळल्यास त्वरित बँक कर्मचा-यांच्या नजरेस आणून द्या.
- कॅश काढतांना काऊंटर सोडायच्या आधी मोजून खात्री करा. शक्यतो पोस्ट डेटेड चेक्स टाळावेत.

---

**बँकेत असतांना :-**

- तुमचे पैस पडल्याचे सांगणा-या माणसामुळे
- तुमचे लक्ष विचलित होऊ देऊ नका.
- पैसे मोजण्यास मदतीचा हात देणा-याकडे लक्ष देऊ नका व त्यांची मदत घेऊ नका.
- आपल्यावर कोणी पाळत ठेवत नाही ना, याची दक्षता घ्या.

---

**या गोष्टी टाळा :-**

- कोणत्याही अनोळखी व्यक्तीला आपल्या बँकेत खाते उघडण्यांसाठी शिफारस देऊ नका.

---

**जमानत घेतांना :-**

- आपल्या मित्रांची जमानत घेतांना पुर्णत: विचार करा. कर्ज फेडी करीता जमानतदार व कर्जदार यांची व्याख्या, दायीत्व सारखेच आहे.